# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे 'विशाखा' पुरस्कार घोषित

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसमाग्रज अध्यासनाच्या वतीने दरवर्षी 'विशाखा काव्य पुरस्कार' दिला जातो. हा पुरस्कार प्रथमतःच प्रकाशित काव्यसंग्रहाला दिला जातो. सन २०२२ चा प्रथम पुरस्कार 'राखायला हवी निजखूण' या सरिता पवार यांच्या काव्यसंग्रहाला, द्वितीय पुरस्कार 'औटघटकेची युगांतरं' या प्रवीण अक्कानवरु यांच्या काव्यसंग्रहाला तर तृतीय पुरस्कार 'आठ फोडा अन बाहेर फेका' या अमोल देशमुख यांच्या काव्यसंग्रहाला जाहीर झाला आहे.

२०२३ चा फक्त प्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे. हा प्रथम पुरस्कार 'जळताना भुई पायतळी' या तान्हाजी बोऱ्हाडे यांच्या काव्यसंग्रहाला मिळाला आहे. अंतिम निवड समितीला द्वितीय व तृतीय पुरस्कार योग्य काव्यसंग्रह न वाटल्यामुळे समितीने शिफारस केली नाही.

२०२२ साठी एकूण २१ काव्यसंग्रह तर २०२३ सालासाठी एकूण ३६ काव्यसंग्रह प्राप्त झाले होते. प्राथमिक छाननी समित्यांनी २०२२ व २०२३ साठी प्रत्येकी सात संग्रह निवडून दिले होते. अंतिम निवड समितीने या संग्रहांमधून वरीलप्रमाणे संग्रहांची पुरस्कारांसाठी निवड केली आहे. मा. कुलगुरु प्रा. डॉ. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाने संगठित समित्यांनी ही द्विस्तरीय निवडप्रक्रिया पार पाडली. या निवडप्रक्रियेचे समन्वयक म्हणून कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी काम पहिले.

या पुरस्कारार्थींचे विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरु डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, कुलसचिव श्री. दिलीप भरड यांनी अभिनंदन केले आहे. या पुरस्कारांचे वितरण विद्यापीठाच्या एखाद्या विभागीय केंद्राच्या ठिकाणी लवकरच केले जाणार आहे.

यापूर्वी जाहीर केलेल्या कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कारांचे वितरण बुधवार, दि. १२ फेब्रुवारी २०२५ रोजी सायं. ०६:०० वाजता सार्वजनिक वाचनालयाच्या मु. शं. औरंगाबादकर सभागृहात केले जाणार आहे असे विद्यापीठाचे कुलसचिव यांनी कळविले आहे.